जन-६-१२००(२)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

## परिपत्रक

क्र. एमओएम/२९६५ दि. ०२.०४.२००४

विषय - महाराष्ट्र माहितीचा अधिकार, २००२
संदर्भ - परिपत्रक क्र.एमओएम/१५४३ दि.२०.१२.०३

उपरोक्त संदर्भित परिपत्रकान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेची आवश्यक ती माहिती जनतेस उपलब्ध करुन देण्यासाठी 'सार्वजनिक माहिती अधिकारी (बृहन्मुंबई महानगरपालिका)' यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

२. उपरोक्त परिपत्रकात अनवधानाने राहून गेलेल्या खात्यांकरिता आणि इमारत प्रस्ताव खात्याबाबतची माहिती देणे सुलभ व्हावे याकरिता खालीलप्रमाणे 'सार्वजनिक माहिती अधिकारी (बृहन्मुंबई महानगरपालिका)' नियुक्त करण्यात येत आहेत.

| क्र. | खाते / विभाग / युनिट | सार्वजनिक माहिती अधिकारी (बृहन्मुंबई महानगरपालिका) |
|---|---|---|
| १. | प्रमुख अभियंता (दक्षता) | प्रमुख अभियंता (दक्षता) |
| २. | दक्षता अधिकारी (विशेष कार्य) | दक्षता अधिकारी (विशेष कार्य) |
| ३. | चाचणी लेखा व दक्षता अधिकारी | चाचणी लेखा व दक्षता अधिकारी |
| ४. | सहायक आयुक्त (नियोजन) | सहायक आयुक्त (नियोजन) |
| ५. | इमारत प्रस्ताव | १. उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) शहर<br>२. उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) प.उ.<br>३. उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) पू.उ. |
| ६. | नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र | उप प्रमुख अभियंता (ना.प्र.सं.व सं.) |

३. विकास नियोजन खात्याकरिता प्रमुख अभियंता (विकास नियोजन) हेच सार्वजनिक माहिती अधिकारी असतील.

४. त्याचप्रमाणे संदर्भित परिपत्रकानुसार संबंधीत खात्यांचे अतिरिक्त आयुक्त हे अपिलीय प्राधिकारी आहेत. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेत महाराष्ट्र माहितीच्या अधिकाराची अंमलबजावणी सुटसुटीत व सुलभ रितीने होण्यासाठी यापुढे संबंधीत खात्यांचे उप आयुक्त / सह आयुक्त / संचालक हे अपिलीय प्राधिकारी असतील.

अन - ६



५. मात्र जलतरण तलाव, नाटयगृहे व अतिक्रमणे निर्मुलन या खात्यांचे सार्वजनिक माहिती अधिकारी संबंधीत उप आयुक्त आहेत. त्यामुळे त्या खात्यांचे अपिलीय प्राधिकारी संबंधीत अति.आयुक्त असतील.

६. नायर रुग्णालय दंत महाविद्यालयाव्यतिरिक्त इतर प्रमुख रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांच्याबाबतीत संबंधित अधिष्ठाता हे सार्वजनिक माहिती अधिकारी असतील व अपिलिय प्राधिकारी सह आयुक्त (वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य) हे असतील. तथापि, नायर रुग्णालय दंत महाविद्यालयाकरिता सह आयुक्त (वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य) हे सार्वजनिक माहिती अधिकारी आणि संबंधित अतिरिक्त आयुक्त त्या खात्याचे अपिलिय प्राधिकारी असतील.

७. त्याचप्रमाणे उपनगरीय रुग्णालयांचे संबंधित वैद्यकीय अधिकारी / प्रमुख वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय अधिक्षक हे संबंधीत रुग्णालयांचे सार्वजनिक माहिती अधिकारी असतील व प्रमुख वैद्यकीय अधिक्षक (उपनगरीय रुग्णालये) हे त्या रुग्णालयांचे अपिलिय प्राधिकारी असतील. उपरोक्त रुग्णालयांच्याव्यतिरिक्त इतर रुग्णालये, प्रसूतिगृहे, दवाखाने च्याबाबतीत सार्वजनिक माहिती अधिकारी म्हणून कार्यकारी आरोग्य अधिकारी हे काम पाहतील आणि त्यांचे अपिलिय प्राधिकारी सह आयुक्त (वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य) हे असतील.

८. उपरोक्त बदलांची सर्व खाते प्रमुख / सहायक आयुक्त / उप आयुक्त / सह आयुक्त / संचालक यांनी नोंद घेऊन तदअनुषंगाने पुढील कार्यवाही करावी.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- | सही/- |
| (जे.सी.गोंधळ) | (एस.एम.चांदेकर) | (सुब्रत रथो) | (जॉनी जोसेफ) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) | अति.आयुक्त (शहर) | महानगरपालिका आयुक्त |

प्रत: प्रशासकीय अधिकारी (प्रमपोप्रम - १) ( १ जादा प्रतीसह) यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

आ.अ. (signature)

रचना व कार्यपध्दती अधिकारी
(आयुक्तांचे कार्यालय)

बृहन्मुंबई महानगरपालिका
प्रमुख कर्मचारी अधिकारी,
(सां. प्र. विभाग)
दि. 12 APR 2004
समय : ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८
क्रमांक प्रमपोप्रम/१/१३५

C:\My Documents\MOM\Ircm...doc

कृपया नोंद घेऊन दप्तरी दाखल करावे

नोंद घेतली

आ.प्र.(प्रमपोप्रम) १६।४

प्र.अ. (प्रमपोप्रम-१)